साप्ताहिक

पत्रकारितेचे मुल्य जतन करणारे वृत्तपत्र

# न्यायस्वातंत्र्य समता

■ RNI. No- MAHMAR/2010/36016 संपादक :- रमेश शेळके कार्यकारी संपादक :- ॲड. चंद्रकांत गायकवाड

■ वर्ष ६ वे ■ अंक २१ वा ■ सोमवार, दि. २० ते २६ जून २०१६ ■ पुणे web : nyayaswatantryasamta.weebly.com ■ किंमत ₹ २ ■ पाने ४

**सुवर्ण संधी**

वृत्तपत्रामध्ये काम करण्याची सुवर्ण संधी, वयाची अट नाही. पत्रकारितेचे प्रशिक्षण दिले जाईल.

संपर्क : ९८२२५३८५८५

# समाजाची फाळणी करणाऱ्यांना साथ नाही : शरद पवार

**पुणे :** 'हा देश कोणाची जहागीर नाही, असे ठणकावून सांगत देश विघातक, सांप्रदायिक शक्तींना साथ देणार नाही, समाजात दुहीचा चुकीचा संदेश देऊन फाळणी करणाऱ्यांना साथ देणार नाही ' असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले.



कोंढव्यातील 'दावत -इ -इफ्तार' कार्यक्रमात ते बोलत होते. मुस्लिम आणि सर्व धर्मीय धर्मगुरू, खासदार सुप्रिया सुळे, खासदार वंदना चव्हाण, महापौर प्रशांत जगताप, अनिस चिश्ती, पी ए इनामदार, आबेदा इनामदार, आमदार जयदेव गायकवाड, बिशप नरेश अंमबिया, सय्यद जलालुद्दीन, इक्रम खान, बलवीरसिंग, इकबाल शेख, हाजी झाकीर शेख, आमदार अनिल भोसले, मौलाना इलारीस काझी, मौलाना अब्दुल समद, मौलाना अक्रम मदनी, मौलाना निजामुद्दीन, मौलाना अफझल खान, उपस्थित होते.

शरद पवार म्हणाले की, 'पुणे हे शांती आणि सलोखा बाळगणारे कॉस्मोपॉलिटियन शहर आहे, येथे सर्व धर्मीय, सर्व भाषिक, सर्व प्रांतीय लोक राहतात. एकत्र सलोख्याने राहणे, हे पुण्याचे वैशिष्ट्य आहे. पण, देशात वेगळे वातावरण तयार करण्याची चर्चा होत आहे. हा देश काही लोकांची जहागीर असल्याची बेजबाबदार वक्तव्ये केली जात आहेत. अशा लोकांना पाठिंबा देऊ नये.

देश मजबूत करणे ही प्रत्येक धर्माची जबाबदारी आहे. देश विघातक, सांप्रदायिक शक्तींना आम्ही साथ देणार नाही. आज या कार्यक्रमात फक्त 'दुआ ' मागू, इतर काही मागणार नाही. शेतकऱ्यांसाठी 'दुआ ' मागू . भूक मुक्तीचे वातावरण तयार व्हावे, सलोखा -शांततेचे वातावरण व्हावे यासाठीच प्रार्थना करू. देशाला प्रगतीच्या रस्त्यावर नेण्यासाठी ताकद द्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## पुणे मेट्रोला मिळणार गती?

**पुणे :** पुणे शहरातील सर्वात महत्वाकांक्षी असणारा मेट्रो प्रकल्प मागील कित्येक वर्षांपासून प्रलंबित आहे. हा प्रकल्प मार्गी लागण्यासाठी येत्या गुरूवारी दिल्ली येथे प्री पीआयबीची बैठक आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त कुणाल कुमार यांनी दिली. या बैठकीत पुणे मेट्रोला गती मिळेल, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.



पुणे शहरातील वाहतूक सक्षम व्हावी. यासाठी शहरात मेट्रो प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट आणि वनाज ते रामवाडी असा ३१ किमीचा मार्ग आहे. या प्रकल्पाचा खर्च काही त्रुटीमुळे १२ हजार कोटीच्या घरात गेला आहे. मात्र या प्रकल्पास गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून २३ जून रोजी प्री पीआयबीच्या बैठकीचे आयोजन केले आहे. यामुळे या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले असून पुण्याच्या प्रस्तावानंतर मुंबई आणि नागपूर मेट्रोचे गेले असताना, या प्रकल्पांना केंद्राने मंजूरी देत राज्याच्या आणि केंद्राच्या अंदाजपत्रकात भरीव अशी तरतूद केली. यामुळे केंद्र आणि राज्य सरकार पुणे मेट्रो प्रश्नावर दुजाभाव करत आहे, असा प्रश्न शहरातील विरोधकांनी उपस्थित केला. पुण्यात भारतीय जनता कार्यकारिणीची बैठक असताना त्यावेळी नगरविकास खात्याचे केंद्रीय मंत्री वैंकय्या नायडू यांनी पूणे मेट्रोला महिनाभरात मंजुरी देऊ, असे जाहीर केले होते.

तसेच २३ जून रोजी प्री पीआयबीची बैठक घेतल्याने त्यावेळी मंजुरी मिळण्याची शक्यता असून पंतप्रधान २५ जूनच्या स्मार्ट सिटीच्या

पान ३ वर⇨

## चित्रफितीतून स्वच्छ लोणावळा सुंदर लोणावळयाचा संदेश

### लोणावळा रोटरी क्लबचा उपक्रम

**लोणावळा :** रोटरी क्लब लोणावळा यांच्या संकल्पनेतून लोणावळा रेल्वे स्थानकावर स्वच्छ लोणावळा सुंदर लोणावळा, पाणी वाचवा पाणी जपून वापरा, झाडे जगवा, मुलगी वाचवा, असे अनेक संदेश देणारे उद्बोधक चित्र काढण्यात आले आहे. या ठिकाणावरचे प्रत्येक चित्र नागरिकांना संदेश देणारे असल्याने याची दखल खुद्द रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांना घेतली आहे.



या विषयी बोलताना रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष नितिन कल्याण व त्यांच्या पत्नी विजया म्हणाल्या फेसबुकवर दि अग्ली इंडिया नावाने बँगलोरची वेबसाईट आहे. तिच्या प्रत्येक पेजवर त्याठिकाणी चित्रफितीमधून कशी स्वच्छतेची सुंदरतेची क्रांती घडवण्यात आली आहे ते मी पाहिले आहे. तसेच पुण्यातील वानरसेना यांनी पुणे व शिवाजीनगर भागात असेच काहीसे उद्बोधक संदेश देणारी चित्रे काढली आहेत. यामधून आपणही आपल्या रेल्वे स्थानकाच्या भिंतीवर असे उद्बोधक संदेश देणारी चित्रफित काढली तर त्यामधून स्वच्छ व सुंदर लोणावळा यासह विविध प्रकारचे संदेश या स्थानकावरुन प्रवास करणारे नागरिक, पर्यटक यांना देता येतील या हेतूने प्रेरित होऊन ही संकल्पना राबविण्यात आली. याकरिता सहा

पान ३ वर⇨

## युती तुटेल, असे वाटत नाही : पवार

**पुणे : प्रतिनिधी**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असताना, शिवसेना सत्तेत होती, तरी त्यांनी सत्तेची फिकीर बाळगली नाही. आता मात्र सत्ता हीच महत्त्वाची आहे. त्यामुळे भाजप आणि शिवसेना एकमेकांना सोडतील, असे वाटत नाही, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मंगळवारी व्यक्त केले.

भाजप-शिवसेना यांची युती तुटून राज्यात मध्यावधी निवडणुका होतील का, या प्रश्नावर पवार म्हणाले, दोघेही सत्ता सोडणार नाहीत. सत्ता हे एकच त्यांना जोडणारे महत्त्वाचे कारण आहे. महापालिका निवडणुकीत दोन्ही पक्षांची युती होण्यासंदर्भात ते म्हणाले, भाजप-शिवसेना युती करतील, असे वाटते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भाषण ऐकले. कार्यकर्ते युती नको म्हणतात. पण कार्यकर्त्यांचे कोण ऐकते.

काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या आघाडीसंदर्भात पवार म्हणाले, आमची एकत्र काम करण्याची तयारी आहे. यासंदर्भात औपचारिक बसलो नाही. पण आघाडी करता येईल.

माजी मंत्री एकनाथ खडसे यांना मुख्यमंत्र्यांनी क्लीन चिट दिल्यासंदर्भात प्रतिक्रिया व्यक्त करताना ते म्हणाले, फडणवीस यांच्या भाषणात सरकारचा मूड काय आहे, ते कळाले. चौकशीसाठी न्यायाधीशांची नेमणूक करणार आहेत. त्यांची निवड अद्याप झालेली नाही. त्या व्यक्तीला कळण्यासाठी ही वक्तव्ये असावीत. हा संदेशच आहे. नियुक्ती कोणाची होते ते पाहू. त्यावर बरेच अवलंबून आहे.

राज्य सरकारने १९९९ ते २०१४ या काळात वाटलेल्या भूखंडाबाबत श्वेतपत्रिका काढण्याच्या भाजपच्या मागणीबाबत पवार म्हणाले, श्वेतपत्रिका काढूया. हरकत काय आहे? सार्वजनिक संस्थांना जागा दिल्या असतील. हे करायला त्यांच्याकडे वेळही खूप असेल, तर करतील.

बाजार समित्यांच्या नियमनमुक्तीबाबत राज्याच्या प्रमुखांशी बोललो असून, ते चर्चेला तयार आहेत. त्यांच्याशी बोलण्यापूर्वी जाहीर बोलणे योग्य नसल्याचे त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.


**सनातनचे प्रकरण गंभीर**

सनातन संस्थेविषयी पवार म्हणाले, आता त्यांच्यावर आरोप आहेत. सीबीआयसारखी संस्था खोलात जाऊन या निष्कर्षाला पोचते, म्हणजे प्रकरण गंभीर आहे. सत्य चित्र लोकांसमोर आले पाहिजे. एखाद्याने टोकाची भूमिका घेतली असेल, तर त्याला कायद्यानुसार त्याच्या परिणामाला सामोरे जावेच लागेल.

## पंतप्रधान मोदींच्या पुणे दौऱ्यात स्मार्ट सिटी स्पर्धेची घोषणा

**पुणे :** स्मार्ट सिटी योजनेच्या घोषणेची वर्षपूर्ती होत असल्यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी २५ जूनला पुणे दौऱ्यावर येत आहेत. यावेळी ते मेक युवर सिटी स्मार्टफया देशव्यापी स्पर्धेची घोषणा करणार आहेत. त्याचबरोबर देशातील ९८ स्मार्ट सिटींच्या प्रोजेक्टची माहिती देणाऱ्या संकेतस्थळाचे उद्घाटनही त्यांच्या होणार आहे, अशी माहिती महापालिकेचे आयुक्त कुणाल कुमार यांनी दिली.

मोदी यांचे २५ जून रोजी दुपारी साडे तीन वाजता लोहगाव विमानतळावर आगमन होईल. तेथून ४ वाजता ते बालेवाडी-म्हाळुंगे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलामधील कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहचतील. तिथे लावण्यात आलेल्या स्मार्ट सिटी प्रदर्शनातील स्टॉलला ते भेट देतील. मेक युवर सिटी क्लीनफ या महत्वाकांक्षी स्पर्धेची घोषणा मोदी यावेळी करतील. यामध्ये एखादा रस्ता किंवा एखादा एरिया कशा पद्धतीने विकसित करता येईल, याचे प्रस्ताव सादर करता येणार आहेत. सर्वसामान्य नागरिक व तज्ज्ञ अशा दोन पातळ्यांवर ही स्पर्धा घेतली जाणार आहे. देशभरातील स्मार्ट सिटीच्या प्रस्तावांची एकत्रित माहिती असलेल्या संकेतस्थळाचे मोदी यांच्या हस्ते उद्घाटन केले जाणार आहे. त्याचबरोबर दोन ते तीन स्मार्ट सिटीच्या महापालिकेतील अधिकारी , पदाधिकाऱ्यांशी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे मोदी संवाद साधतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय नगरविकास मंत्री व्यंकय्या नायडू यांच्या भाषणानंतर मोदी उपस्थितांशी संवाद साधणार आहेत.




## पुण्यातील विद्यार्थ्यांच्या 'स्वयम्'सह २० उपग्रहांचे यशस्वी प्रक्षेपण

**पुणे :** पुण्यातल्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या (सीओईपी) विद्यार्थ्यांनी तयार केलेला 'स्वयम' या उपग्रहाचे इस्रोच्या एकाच वेळी २० उपग्रह लाँच करण्याच्या महत्वाकांक्षी मोहिमेत यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. दरम्यान या विक्रमाबरोबरच इस्रोने आज इतिहास रचला.श्रीहरिकोटातील सतीश धवन अंतराळ संशोधन केंद्रावरुन पीएसएलव्ही सी ३४ हे यान एकूण २० उपग्रहांसह आज सकाळी ९ वाजून २६ मिनिटांनी अवकाशात झेपावले.

पान ३ वर⇨